तपस्मृतीची अक्षरशिल्पे

# प्रेरणाक्षरे

२०१९

संवेदनशील मनांची
प्रेरणा
एक
कलामंच

अभिनय कार्यशाळा

प्रतिबिंब - एक स्वच्छंद सुसंवाद

अक्षरवाटा - एक वाचनकट्टा

















* स्मरणिका समिती
  अश्विनी काशीकर, सई लिमये, सावनी उपाध्ये, मेधा पुरकर,
  अमोघ वैद्य, दिप्ती असवडेकर, गौरी अष्टेकर, मेधा टेंगशे

* मुखपृष्ठ
  आरती कुलकर्णी

* अंतर्गत सजावट व मुद्रक
  प्रतिमा ऑफसेट, पुणे

* खाजगी वितरणाकरिता



# 'प्रेरणा - एक कलामंच'

कलेची आस, मूल्यांचा ध्यास आणि नाविन्याची धरलेली कास हे ध्येय उराशी बाळगून प्रेरणा एक कलामंच बारा वर्ष काम करत आहे. हा प्रवास आयुष्य घडवणारा होता. काय काय मिळालं या १२ वर्षांत – अनेक गुणी, हुषार विद्यार्थ्यांचे प्रेम, सहवास आणि प्रेरणा. अनेक मैत्रिणींची विश्वासाची मैत्री, खूप पालकांची आणि हितचिंतकांची साथ आणि समृद्धता!

रंगभूमीच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास या हेतूने १२ वर्षांपूर्वी काम सुरू केले. ज्यातून अनेकविध विषयांवर लेखन घडले. लेखन, दिग्दर्शन, प्रशिक्षण करून मुलांबरोबर स्वत:ही घडत जाणं, ही प्रक्रिया खूपच सुंदर होती. या काळात टीम प्रेरणाची वीण ही दिवसेंदिवस घट्ट आणि सुरेख गुंफत गेली. रंगभूमीवरचे आणि कार्यशाळेमधील अनेक प्रयोगांना उत्तुंग यश मिळत गेलं. आत्मविश्वास वाढत राहिला. वेगवेगळे विषय हाताळताना सृजनशीलता आणि सर्जनशीलतेला वाव मिळत गेला. नि:स्वार्थी हेतूने नाट्यकलेची नितांत श्रद्धेने पूजा होत राहिली. मूल्यांना जपत हा यज्ञ सातत्याने चालू ठेवण्याचा ध्यास घेतला. संवेदनशीलता जपत नवनवीन प्रयोग घडले. सकारात्मक ऊर्जा मिळत गेली. संघभावनेचा एक आदर्श उभा राहिला. विश्वासाला जपत पारदर्शक वृत्तीने हे कार्य घडत गेले. समर्पित भावनेनी समृद्ध झालेला हा प्रवास खूप काही शिकवून गेला. आणि आता या टप्प्यावर तपपूर्तीच्या निमित्ताने घडत असलेल्या 'प्रेरणायन' या नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने घेतलेला हा 'मागोवा' – 'प्रेरणाक्षरे'

प्रेरणाक्षरेच्या निमित्ताने तुम्हां सर्वांशी साधलेला हा संवाद. काही वेळा प्रत्यक्ष बोलण्यापेक्षा अक्षरांचे माध्यम अधिक प्रभावी ठरते, व्यक्त होण्यासाठी. आज मलाही मनातल्या अनेक भावनांना या निमित्ताने मोकळं करता येत आहे. आपल्या माणसांनी आपल्यासाठी जे जे केलेले असते, ते अमूल्य असते आणि त्यासाठी कायम ऋणातच रहायचे असते. तरी त्यांच्या बद्दलच्या भावना खूप भरून येतात. त्या त्यांच्यापर्यंत पोहोचल्या तरच त्या भावनांना न्याय मिळतो. प्रेरणाक्षरेमध्ये या निमित्ताने आज मी तेच करतेय. प्रेरणाच्या पहिल्या दिवसापासून जी व्यक्ती अत्यंत निष्ठेने माझ्याबरोबर आहे आणि 'प्रेरणाक्षरे'च्या संपादनाची जिने पूर्ण जबाबदारी घेतली ती अश्विनी काशीकर– प्रेरणामधील प्रत्येक घटनेची साक्षीदार. तिचे प्रेम खूप भरभरून मिळाले. या अंकासाठी सई लिमये, सावनी उपाध्ये या गोड मुलींनी सुद्धा सृजनशीलतेने खूप नियोजनबद्ध काम केले. या १२ वर्षांत अश्विनी बरोबरीने अनेकजणी माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनल्या. सोनिया केतकर, वर्षा जोशी, सोनाली पाटसकर, हर्षदा अमृतकर, वीणा लिमये, अर्चना साने, आरती कुलकर्णी, राजश्री कुलकर्णी, आरती जोशी, मंजिरी कुलकर्णी, जुईली कुलकर्णी, मेधा पूरकर, वृंदा लिमये, ऋजुता सोमण, पूर्वा परांजपे आणि आमची दिवंगत मैत्रिण शुभांगी सुद्धा. या सगळ्यांनी माझे, माझ्या परिवाराचे आणि प्रेरणाचे आयुष्य समृद्ध केले आहे. प्रेरणाच्या या तपपूर्तीमध्ये यांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे.

प्रेरणाचे पहिल्या दिवसापासूनचे सर्वच्या सर्व विद्यार्थी तर प्रेरणाचे चैतन्य आहे. त्यांच्यामुळे, त्यांच्या प्रेमामुळे, निष्ठेमुळेच आज प्रेरणा दिमाखदार नाट्यसोहळा साजरा करत आहे. शिवाय सर्व पालक आणि अनेक अनेक हितचिंतकांच्याही ऋणात रहायला आवडेल. निलिमा रास्ते आणि विशाखा वेलणकर तसेच अक्षरवाटेचे सर्व सदस्य, प्रतिबिंबसाठी कायम सज्ज असणारी पट्टणकोडोलीची टीम, पुष्कर केळकर सगळ्यांनी प्रेरणाच्या यशासाठी कायमच नि:स्वार्थी हात दिले. कितीतरी मान्यवर आहेत ज्यांनी कायम प्रोत्साहन दिले. डॉ. अनिल अवचट, डॉ.न.म. जोशी, शुभांगी दामले, प्रसन्न केतकर यांनी प्रोत्साहनाबरोबर काही चांगल्या गोष्टीही शिकवल्या. सुप्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ (जॅकी दादा) यांनी तर अनेकदा कल्पनेपलीकडे प्रोत्साहन देऊन आनंद दिला. दिवंगत लेखक शं. ना. नवरे यांचे आशीर्वाद कायम बरोबर असतील.

उपाध्ये आणि जोशी कुटुंबाचा भक्कम आधार पाठीशी होता आणि श्रीराम – सावनीही पूर्ण प्रेरणामय झाले म्हणून आज हा दिवस साश्रू नयनांनी पहात आहे. हे क्षण वारंवार अनुभवायचे. हे काम असंच सातत्याने करायचे आहे. आनंदमय जीवन जगत सतत आनंद वाटायचा आहे. प्रेरणाचा परिवार अजून मोठा करायचा आहे. आणि वर्षानुवर्षे हा यज्ञ इतक्याच निष्ठेने चालू ठेवायचा आहे.

**स्वाती उपाध्ये**

संचालिका, प्रेरणा – एक कलामंच



# संपादकीय

नमस्कार,

प्रेरणाचा पहिला वहिला अंक आपल्या हातात देताना खूप आनंद होत आहे.

प्रेरणा... संवेदनशील मनांची प्रेरणा! आपल्या भावना व्यक्त करण्याचे लेखणी एक सुंदर माध्यम व अक्षरांमध्ये प्रेरणा देण्याची ताकद असते म्हणूनच जेव्हा अंक काढायचे ठरले तेव्हा नाव ठरले प्रेरणाक्षरे. प्रेरणा मधील प्रत्येक घटक संवेदनशील मनाचा व विचार करणारा.

अगदी पहिली ते चौथी पर्यंतची मुले सुद्धा जेव्हा ताईने एखादा विषय दिल्यावर खूप सुंदर विचार करून सादरीकरण करतात तेव्हा अरेच्चा! ही मुले असाही विचार करू शकतात? असा आम्हाला प्रश्न पडतो. त्यामुळे या इवल्याशा डोक्यात विचार मात्र मोठे असणार हे जाणूनच विषय ठरवले.

पाचवी ते सातवी म्हणजे तर विचारांचे खाद्य पुरवावे तेवढे कमीच पडेल असे वय. म्हणून ह्या वयोगटात मुलांच्या बुद्धीला चालना देणारे विषय ठरवण्यात आले.

तसेच आठवी ते दहावी म्हणजे स्वतःचा शोध घेण्याचे वय म्हणून त्यांना पडलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांना शोधता यावीत असे विषय त्यांच्यासाठी ठरवण्यात आले.

आणि आता युवा गट... स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी धडपडणारा, मग त्यांना विषयही तसेच हवेत.

पालक हे तर प्रेरणेचा कणा... प्रेरणा मध्ये आपले पाल्य घालण्याचा निर्णय घेणे हाच त्यांचा जबाबदार नागरीक असण्याचा पुरावा आहे असे मला वाटते कारण प्रेरणा मध्ये आपल्या पाल्याला घातल्यावर त्याच्याबरोबर आपण ही घडतो हे प्रेरणाची एक पालक म्हणून मी अनुभवले आहे. आपल्या मुलासाठी काय चांगले आहे ते कळणे म्हणजे खरे जबाबदार पालक.

तर अशा जबाबदार पालकांसाठी विषय निवडताना आमची जबाबदारी वाढली तर होतीच आणि खात्री पण होती की पालक नेहमीप्रमाणे आम्हाला उत्तम प्रतिसाद देतील.

तसेच आमच्या मैत्रिणी ज्या back stage अगदी नियोजनपूर्वक सांभाळतात. त्या ही संवेदनशील प्रेरणाच्या मुख्य घटक, त्यामुळे त्यांच्या लेखणीतून नक्कीच उत्तम काहीतरी साकार होणार ही खात्री तर होतीच.

हा अंक तयार करताना कमिटी मधील प्रत्येकाने तर आपली जबाबदारी पार पाडली आहेच पण प्रेरणा मधील प्रत्येक व्यक्तीचा त्यात हातभार आहे.

तर असा हा संवेदनशील मनाच्या प्रेरणेचा अंक आपल्या हातात देताना मनापासून आनंद होत आहे.

**अश्विनी काशीकर**
संपादक







# प्रेरणादायी तपपूर्ती

कलासक्ती दाटून आली,
जागली ऊर्जा अन् प्रतिभा
नक्षत्र ''स्वाती'' आतुर झाली
बाल मोती वेचण्या

समविचारी सूर जुळले
''श्रीराम'' पाठीशी सतत उभा
''प्रेरणा'' रुपास आली,
नवस्वप्न हे साकारण्या

प्रेरणा अशी जोपासताना;
साथ मिळाली उत्कृष्ट अशी
प्रत्येकाचे स्थान असे की
चंद्राभोवती अनेक राशी

आयुष्य म्हणजे रंगमंच,
ठाऊक होते हे जरी
''प्रेरणा एक कलामंच''
हाच ध्यास होता उरी

विषय वेगळे, विचार नवा
''हटके'' करुया हाच वसा
निकोप कला सहजी जपू,
विश्वास होता पुरता तसा

नाट्य कळते, ललित उमगते;
विचार साऱ्या साहित्याचा
भाषा फुलते, वाचन खुलते;
उद्देश्य सर्वांगीण विकासाचा

भुलभुल्लैय्या दुनियेपेक्षा;
मेहनत, सचोटी हीच खरी
कलाकृती उत्तम हवी;
भूमिका असली कुठलीही तरी

पु.ल. रमले, टागोर कळले
याच मंचाच्या प्रांगणी
''वसुंधरा'' जागवते महत्त्व;
निसर्ग, कचरा अन् पाणी

पाऊस पैंजणी कवितेच्या;
चिंब भिजली मुले सारी
अवचटांच्या गोष्टीतून कळली
सृष्टीची ही मौज न्यारी

पराक्रम असो शिवरायांचा,
की असो दहशत हिटलरची
गोष्ट असो गणूची,
वा पोलंडच्या मारी क्युरीची

शोधती ''प्रतिबिंब'' स्वतःचे;
प्रगल्भ होती बालके
''अक्षरवाटां''वरती फिरती;
आबालवृद्धांचे घोळके

मोकळा संवाद जेथे
सर्जनतेची कळी खुले
ताई करी प्रेम येथे;
केंद्रस्थानी असती मुले

वटवृक्ष ''प्रेरणा'' परिवाराचा;
असाच वृध्दींगत होतो.
सदस्य बांधील या नात्याचा;
स्नेहनाळ धरुनी राहतो

हितचिंतक पालक, समृध्द बालक
हीच खरी ''प्रेरणा''
एक तपाची वाटचाल ही,
मिरविते उरी सौजन्यखुणा

शुभेच्छांचे पंख लावुनी
''प्रेरणा'' घे गरुड भरारी
कलेच्या या दिगंतात ही;
चमकेल शाश्वत ध्रुवापरी

**राजश्री कुलकर्णी**



# प्रेरणा एक परीस स्पर्श

॥ श्री ॥

माझा मुलगा गेली ५ वर्षे आणि मुलगी १० वर्षे 'प्रेरणा'मध्ये येतात. मागच्या वर्षी स्वातीताईने मुलांना विचारले, ''प्रेरणा म्हणजे काय? तुम्हाला काय वाटतं?'' मुलांनी अतिशय समर्पक, सुंदर उत्तरे दिली. प्रेरणा म्हणजे... धमाल, मस्ती, मजा, आनंद, भावनांना मिळालेली वाट... उत्साह, स्फूर्ती....

हे सर्व ऐकलं आणि मन १० वर्षे मागे धावत गेलं. माझी मुलगी ऋतुपर्णा ही शाळेत अबोल होत चालली होती. शाळेतून शिक्षकांनी तसे मला बोलावून सांगितले होते. माझ्या यजमानांची बदली नगरला झाली होती, मी नोकरी करत होते. ती पाळणाघरात असायची. त्यामुळे तिच्यासाठी नीटसा वेळ मी नव्हते देऊ शकत. यातच 'प्रेरणा'च्या स्वातीताईंशी ओळख झाली. तिच्याशी मी हे सर्व बोलले. पहिल्याच भेटीत मला खूप हलकं वाटलं तिच्याशी बोलून. ती म्हणाली, ''दोन महिन्यात ऋतुमध्ये बदल होतील आणि खरंच...'' ऋतु 'प्रेरणा' मध्ये मोकळी होत गेली आणि तिचे मूळचे आनंदी वागणे, बोलणे पूर्ववत झाले. पुण्यात होणारी 'भालबा केळकर स्पर्धा' त्या नाटकांच्या तालमी, त्याचा जल्लोष अजूनही आठवतो. 'प्रेरणा'च्या नाटकांनी कायम स्पर्धेत नंबर मिळवला.

मुलांचे पहिले आकर्षण आहे स्वातीताई... आनंदी, हसरी, उत्साही... अत्यंत positive. मी तिच्या तोंडून असं कधीच ऐकलं नाही की, हल्लीची मुले अशी आहेत. आमच्या वेळी असं असायचं. ती या पिढीबरोबरच असते. मुलांना समजून घेते. तसेच काही चुकत असलं तर ती अत्यंत शांतपणे पालकांना सांगते. यामुळे पालकांना आपल्या मुलांचे वागणे कसे बदलता येईल याचेही मार्गदर्शन होते. आणि पाल्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. मुले इथे script ची चर्चा करतात, ते लिहितात, काही वेळा मोठी मुले आपापले scenes बसवतातही... मुलांना इथे मिळणारं कामातलं स्वातंत्र्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पोषक ठरतं. मुलांमध्ये श्रीरामकाका अत्यंत लाडके आहेत. अत्यंत मोकळेपणाने, प्रेमाने त्यांचे बोलणे मुलांना खूप आवडते. इथल्या सर्व ताई, मावशी, मुलांशी खेळीमेळीने वागतात. या आनंदी वातावरणामुळे मुले 'प्रेरणा'मध्ये रमून जातात.

'प्रेरणा' मध्ये कायम विविध क्षेत्रात अत्यंत जिद्दीने, कष्टाने स्थान मिळवणाऱ्या व्यक्तींना बोलावलं जातं. मुले त्यांच्याशी गप्पा मारतात. मुलांची माहिती, जिद्द यामुळे वाढते. इथे निलिमाताई आणि विशाखाताई या मुलांशी गप्पागोष्टी करत, कोडी टाकत मुलांची भाषा समृद्ध करतात. स्वातीताई कायम वेगवेगळ्या मार्गांनी मुलांची जिज्ञासा, कल्पकता, विचारशक्ती कशी वाढवता येईल यासाठी अविरत प्रयत्न करते.

'प्रेरणा'ची नाटके अनेक दिग्गजांनी वाखाणली आहेत. जॅकी श्रॉफ, अनिल अवचट, शोभाताई भागवत ही यापैकी काही नावे.

असं म्हणतात, स्वाती नक्षत्रात शिंपल्यात पावसाच्या पाण्याचा थेंब पडला की, त्याचा मोती होतो. आम्ही आमचा पाल्यरूपी थेंब स्वातीताई नक्षत्रात प्रेरणाच्या शिंपल्यात सुपूर्त केला आहे. त्याचा मोती होताना आम्ही पाहत आहोत.

**सोनाली जोशी**







# ...आणि अशी झाली तणावमुक्ती

विश्वनाथ कुलकर्णी हा अतिशय हुशार मुलगा होता. घरातले सगळेजण त्याला लाडाने विशू म्हणत असत. सन २०११. विशूच्या घरातील एकदम गंभीर वर्ष होते. त्या वर्षी विशूची १०वी ची बोर्डाची परीक्षा होती. विशूने ठरवलंच होतं की या परीक्षेत ९०%च्या पुढचे मार्क मिळवायचे म्हणून.

विशूच्या आईचं नाव नर्मदा होतं. ती त्या वर्षी विशू बरोबर जणू काही यमराजासारखी वागत होती. म्हणजेच की ती विशूला आपल्या मित्रांबरोबर खेळू द्यायची नाही. त्यांच्या बरोबर बोलू द्यायची नाही. विशू गिटार खूप छान वाजवायचा. पण १०वी च्या परीक्षेमुळे तिने त्याचा तो क्लास पण बंद करून टाकला. त्याला नुसता अभ्यास एके अभ्यासच करायला लावला.

हळू हळू दिवस उलटत गेले. शेवटी येऊन ठेवली ती सहामाही परीक्षा. पहिलाच पेपर होता गणिताचा. त्या पेपरच्या आदल्या दिवशी विशूने आईला विचारलं, ''आईऽ! मी कौस्तुभकडे जाऊ का? त्याला गणितातला एक प्रश्न विचारायचा आहे.'' आई त्याला रागावून म्हणाली, ''काहीही गरज नाही आहे कौस्तुभकडे जाण्याची. तू आत्ता ताबडतोब आपल्या खोली मध्ये जाऊन अभ्यासला बस.'' विशू आईला 'ठीक आहे.' असं म्हणतो आणि अभ्यासला बसतो. दुसऱ्या दिवशी पेपर झाल्यानंतर आईने विशूला विचारलं, ''काय मग, कसा गेला पेपर?'' ''खूप वाईट गेला. त्या एका गणिताच्या ताणामुळे मी बाकीच्या उदाहरणाकडे नीट लक्षच दिलं नाही. आणि नेमकं जे गणित कठीण जात होतं ते आलं पेपरला.'' विशूने सांगितलं. आईला हे वाक्य ऐकून धक्काच बसला. तिला कळतच नव्हतं काय बोलायचं ते. विशू खूप हुशार मुलगा होता. त्याला आजपर्यंत कुठलाच पेपर कठीण गेला नव्हता. ती फक्त एवढंच म्हणाली की, ''ठीक आहे. अजून बाकीचे पेपर्स उरले आहेत. त्या विषयांचा चांगला अभ्यास कर.'' पण तरीही विशूचं अभ्यासामध्ये काहीच लक्ष लागत नव्हतं. अखेरीस त्याचा सहामाहीचा निकाल लागला. विशूला सगळ्या विषयांमध्ये अपेक्षेपेक्षा खूपच कमी मार्क मिळाले होते. त्याचे सगळे मार्क पाहिल्यानंतर त्याची, आई खूप रागावली त्याला, खूप मारलं. विशूला या सगळ्या गोष्टींचा खूप ताण आला होता. त्याला अभ्यासच करायचा नव्हता. हे सगळं त्याच्या बाबांच्या लक्षात येत होतं. त्यांनी आईशी बोलायचं ठरवलं.

आईला पण जरा विशूची चिंता वाटत होती. तिला कळत नव्हतं काय करायचं ते. ती सारखं त्यांना विचारायची की, ''अहो! मला विशूची खूप काळजी वाटत आहे. काय करायचं?'' बाबांनी तिला समजवलं, ''हे बघ विशू खूप हुशार मुलगा आहे. त्याला बोर्डात चांगलेच मार्क पडणार आहेत. पण त्याला अभ्यासाचा खूप ताण येत आहे.'' आईने विचारलं, ''मग ताण घालवायला काय करायचं?'' बाबा म्हणाले, ''त्याला गिटार खूप छान वाजवता येते. असं म्हणतात की, 'सा कला या विमुक्त ये' आपण त्याला परत एकदा गिटारच्या क्लासला घालून बघू. मग बघ त्याला कसे छान मार्क पडतात ते.'' मग आईने विशूला परत गिटारचा क्लास लावला. तो आता आनंदाने अभ्यास करायला लागला.

विशूची बोर्डाची परीक्षा सुरू झाली. प्रत्येक पेपर झाल्यानंतर तो आईला सांगायचा की, पेपर कसा गेला, कसा सोडवला. खरंच कुठलीही कला जोपासली की तणाव मुक्ती होतेच.

**तात्पर्य :** असं म्हणतात की, 'सा विद्या या विमुक्त ये' पण त्याच्या ऐवजी आपण 'सा कला या विमुक्त ये' असं म्हणू शकतो.

**सई श्रीकांत भागवत**





## जबाबदार नागरिक

हे विश्वची माझे घर, जाणुनी जर मानिले आपुले सारे
माझीच भूमी हि, भवती सारे सगे सोयरे ।।

हे रस्ते जेव्हा, माझ्या घराची जमीन वाटे
येता जाता, थुंकीन का मग मीही कोठे ? ।।

वेल दारची, उपटली कधी का हो जाते
वृक्षतोड का होईल जर झाडांशी नाते ।।

माझ्या घरच्या, भिंती पक्क्या संरक्षण जेथे
कोसळती का इमारती मग भेसळ तेथे ।।

टाकी मधले पाणी कसे मी स्वच्छ ठेवतो
का माता सरितेला मग निर्माल्य अर्पितो।।

भिंतीवरती दिसतात कधी का नियमांच्या पाट्या?
लटकतात कधी का बॅनर मोठे घरात माझ्या ? ।।

कारवाई मग कशास आणि कशास होईल दंड
मीच जेव्हा माझ्यावरती घालून घेईन बंध ।।

मानितो स्वतःला पालक या विश्वाचा जेव्हा
जबाबदार हा नागरिक मी असतो तेव्हा ।।

**सौ. दीप्ती असवडेकर**



## नदीचे आर्जव

मनी माझ्या तळमळ, जरी उदरी उमाळा ।
श्वास येईना मोकळा, सोसताना कैक कळा ।।

कधी होते अवखळ, निर्मळ होते जळ ।
आता केवळ हा मळ, गेला जीव तळागाळा ।।

निळेशार ते आभाळ, विरघळे माझ्या जळा ।
आता पाणी त्याच्या डोळा, माझा सुकलेला गळा ।।

आता नसे पाणथळ, नसे काठ गवताळ ।
कसा खग यावा खेळा, कसा नटावा तो मेळा ।।

मही माझी माय भोळी, मही धरा माथी कुदळी ।
जरी सासर अटळ, असे सागरी सापळा ।।

आता थांबवा हा खेळ, असे अधिक बावळा ।
एक कुळ, एक नाळ, पडे विसर सकळा ।।

आता सोडवा वेटोळा, आता सोडवा मोहाळा ।
करा जळ हे नितळ, उरे साजिरा सोहळा ।।

**मेधा टेंगशे**



# संवेदनेतून संवेदनशीलतेकडे

'संवेदनेतून संवेदनशीलतेकडे', या विषयावर लिहायचं असा विचार जेव्हा मी करायला लागले तेव्हा गेली अनेक वर्षं प्रेरणामध्ये येत असताना घडलेले अनेक प्रसंग माझ्या डोळ्यासमोर आले आणि त्या सर्व प्रसंगातून माझाच संवेदनशीलतेकडे प्रवास किती छान झाला हे माझ्या लक्षात आले.

प्रेरणामध्ये काही काळ गेल्यानंतर आमच्या नाट्यशिक्षणाचा एक भाग म्हणून ताईने सांगितलं की स्टेजवर स्वत: उभं राहून काहीतरी सादर करणं म्हणजे फक्त नाटक नाही, तर इतर बाबींचा अभ्याससुद्धा तुमचा झाला पाहिजे म्हणून एके दिवशी तिने मला माझ्यापेक्षा खूप लहान मुलांचं नाटक बसवायला सांगितलं. सुरुवातीला ते मला अगदी सोप्प वाटलं पण जेव्हा प्रत्यक्ष वेळ आली तेव्हा मात्र मला ते भला मोठा मोनोलॉग पाठ करणे, बॅकस्टेज सांभाळणं, लाईट, म्युझिक सांभाळणं या सगळ्यांपेक्षा खूप अवघड वाटलं.

मी बसवलेलं नाटक जेव्हा छोटी मुलं सादर करत होती तेव्हा विंगेत उभे राहून मला जे काही टेन्शन आलं होतं ते मी कधीच विसरू शकणार नाही. तेव्हापासून आमच्या सारख्या तीस-पस्तीस मुलांना ताई कशी काय सांभाळते आणि तिचं काम किती अवघड आहे, आम्ही वेड्यासारखं वागल्यावर तिला किती त्रास होतो हे सगळं कळलं.

आम्ही स्टेजवर असताना विंगमध्ये ताई जिथे उभी असते तिथे आता मी उभी होते आणि माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून ती थोडी लांब उभी होती आणि अचानक स्टेजवर शांतता पसरली. माझ्या नाटकातील एक मुलगी तिचं वाक्य विसरली. पण काही सेकंदातच तिच्याबरोबरच्या मैत्रिणींनी तिचं विसरलेलं वाक्य असं काही बदलून घेतलं की प्रेक्षकांना काहीही न कळता नाटक सहज पुढे गेलं आणि मग मी एकदम भानावर आले. सरावाच्या वेळी ताई आम्हाला जे सांगत असते ते किती महत्त्वाचं असतं हे लक्षात आलं, त्यामुळेच ती छोटी मुलगी ते वाक्य बोलू शकली.

त्यानंतर मात्र आम्ही प्रयोग सादर करत असताना ताईला येत असलेला अस्वस्थपणा आणि तिच्यावर येत असलेलं प्रेशर मला अगदी योग्य वाटायला लागलं.

संवेदनशीलतेकडे माझा झालेला हा प्रवास आयुष्यामध्ये दुसऱ्या माणसाचं मन समजून घेण्यासाठी मला आयुष्यभर उपयोगी पडणार आहे.

**मैत्रेयी सुगवेकर**





# प्रिय प्रेरणा...

प्रिय प्रेरणा,

आज तू बारा वर्षांची झालीस, तुला मन:पूर्वक शुभेच्छा. एक तप पूर्ण करून तू आता नवीन जगात प्रवेश करणार, म्हणजे अधिकाधिक जबाबदारी वाढणार. अर्थात हे सर्व पेलायला तू समर्थ आहेसच. प्रेरणा, तू आम्हाला किती आनंद आणि ऊर्जा दिली आहेस याची तुला खरंच कल्पना नाही. वयाच्या मानाने तुझी प्रगती आणि प्रगल्भता खरच अचंबित करणारी आहे. एवढीशी होतीस तेव्हापासून बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, तसे तुझे उज्ज्वल भविष्य दिसत होते. तुझ्यावर नटराज आणि सरस्वतीचा वरदहस्त आहे हे नक्की. माणसांना सामावून घेवून भरभरून देण्याची तुझी वृत्ती कमाल आहे. लहानग्यांपासून ते अगदी पन्नाशीपर्यंत अनेकरंगी, अनेकढंगी वल्लींना एकत्रित बांधून ठेवणं हे मुळीच सोपं काम नाही. पण ते तू सहज साध्य केलंस. या विविध रंगांच्या, विविध पोताच्या आडव्या उभ्या धाग्यांची वीण दिवसेंदिवस पक्की होताना दिसते. अनेक धागे नव्याने जोडले जात आहेत. त्यामुळे हे जरतारी वस्त्र अधिकाधिक सुंदर आणि तलम होत जाणार हे नक्की.

अर्थात तुला समृद्ध करण्याचे श्रेय स्वातीताईला आहे. तिच्याबद्दल आम्हाला किती आणि काय वाटतं हे सहजगत्या नाही व्यक्त करता येत. स्वाती तुझ्या बुद्धिमत्तेला, कल्पकतेला आणि तुझ्यातील सर्जनशीलतेला प्रणाम. आणि ह्या सगळ्यात तुला समर्थ साथ देणाऱ्या श्रीरामलाही सलाम. तू प्रेरणावर जितके प्रेम करतेस किंवा तिची काळजी घेतेस, तितकीच किंबहुना कणभर जास्तच तुझ्यावर प्रेम करणारी आणि सदैव तुला प्रोत्साहन देणारी तुझी आई, तिला त्रिवार वंदन. कोणतीही गोष्ट नव्याने कळली की ती आम्हाला सांगण्याची लगबग खूप लोभस आहे. कोणताही निर्णय घेताना तुझ्याकडे निर्णयक्षमता असतानाही आमच्याशीच काय, पण ह्या मुलांशी चर्चा करताना बघितलं की खूप आश्चर्य वाटतं. कारण आमचा, किंबहुना माझा तर ह्या क्षेत्राशी काहीच संबंध नाही. तरी कधी काही सुचवलं, काही सांगितलं, तरी शांतपणे आणि मनापासून ऐकतेस आणि त्यावर विचार करतेस. नवनवीन शिकण्याचा तुझा ध्यास गुरुच्या भूमिकेतून विद्यार्थी दशेत सहज नेतो. तुझ्या ह्या सहज स्वभावामुळे तू आमच्यासारख्या अनेकांना नात्यात बांधून ठेवले आहेस. तुझ्या कर्तृत्वाचा तुला जराही गर्व नाही. तुझ्यातील ही सहजता सदैव जपून ठेव.

तर प्रेरणा, अशी ही तुझी जन्मदात्री, आमची खूप छान मैत्रीण आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. हे सगळं कौतुक होतच राहणार, पण काही सांगितलं, सुचवलं तर रागावू नकोस हं. फक्त आणि फक्त वयाच्या ज्येष्ठतेचा फायदा घेऊन हे सांगते. कसं असतं ना, की बाळ लहान असतं तेव्हा त्याने टाकलेलं प्रत्येक पाउल हे कौतुकास्पद असतं. चुकून लागलेला धक्काही सहज स्वीकारला जातो. पण मूल जस मोठं होतं तश्या नजरा बदलतात, त्यामुळे खूप कमी काळात जास्त प्रगती झाली की ती लोकांच्या नजरेत भरते. तू तर लहान वयातच मोठ्यांची बरोबरी सहज करू लागलीस. तू आज बारा वर्षांची झालीस, तू आता अधिकाधिक देखणी आणि प्रगल्भ होत जाणार. त्यामुळे कौतुकाच्या नजरांबरोबरच वक्रदृष्टी आणि असूयाही झेलावी लागणार हे ध्यानात ठेव. कारण माणूस जसजसा उच्च पदावर जातो तसतसे भोवतालचे खुषमस्करे वाढत जातात. त्यामुळे आता तुझी जबाबदारी अधिक वाढली हे नक्की. पण तुझ्यावरचे संस्कारच असे आहेत की तू भूलथापांना फसणार नाहीस. तुझी वाटचाल समर्थपणे चालू ठेवशील.

प्रेरणा तुझ्यामुळे मला खूप छान मैत्रिणी मिळाल्या. एकमेकींच्या सहवासात आमच्या पैकी प्रत्येकीला कायम सकारात्मक उर्जा मिळते. मग ती चर्चा असो, गप्पा असोत किंवा अगदी हलकेफुलके विनोद असोत, किंवा नुसतंच एकत्र चहा पिणं असो, आम्हाला पुढच्या भेटीपर्यंतचा ऑक्सिजन मिळतो.

मी आज व्यक्त केलेल्या भावना ह्या आमच्यापैकी प्रत्येकीच्या मनातील आहेत. उत्तरोत्तर अशीच प्रगती करत रहा. तुझे कलोपासनेचे अग्निहोत्र सदैव प्रज्वलित राहो. तुझी स्वत:ची वास्तूही लवकर होवो ह्या मनपूर्वक सदिच्छा.

**वर्षा जोशी**



# नाटकाची रेसिपी

आपण टीव्ही, इंटरनेट, वर्तमानपत्र व पुस्तकांमध्ये वेगवेगळ्या रेसिपी बघितल्या / वाचल्या असतील. त्यात निरनिराळे साहित्य वापरून एक छानसा पदार्थ तयार होतो. मी काही तुम्हाला कोणत्या पदार्थांच्या रेसिपीबद्दल सांगत नाहीये, मी बोलते आहे नाटकाच्या रेसिपीबद्दल.

आता नाटकाची रेसिपी, म्हणजे काय असा प्रश्न पडला असेल, नाही का? चला तर मग बघूयात नाटकाची रेसिपी.

सर्वप्रथम साहित्य गोळा करावे.

कलाकार, हावभाव, इमोशन्स, बॉडी लँग्वेज, प्रॉप्स, सेट, मेकअप कीट, कॉस्च्युम, कोओर्डिनेशन.

**कृती :** सगळ्यात आधी कलाकारांची टीम गोळा करून कास्टिंग करून घ्यावे. त्यानंतर स्क्रिप्ट वाचून त्या विषयावर लक्ष केंद्रित करायचे. ते नाटक खमंग व खुसखुशीत होण्यासाठी त्यात भरपूर एनर्जी घालावी व मसाले घालावेत. आता मसाले म्हणजे चाट मसाला, गोडा मसाला नाही हो, तर मसाले म्हणजे हावभाव, इमोशन्स, बॉडी लँग्वेज वगैरे वगैरे....

याचा रोज सराव करावा. हे सगळं छान एकजीव करून घ्यावं म्हणजे ऐन वेळेस काही कमी-जास्त होत नाही. नाटक नेहमी जीव ओतून करावं म्हणजे इतरांना व आपल्यालाही त्याचा आनंद घेता येतो. आणि उत्कृष्ठ पद्धतीने सादरीकरण केल्याने त्याची मजा अजूनच वाढेल. तर मग कराल ना ही रेसिपी!

**सावनी मंदार कुलकर्णी**



# माझ स्टेजवरचं पहिलं पाऊल

ताईने जेव्हा आम्हाला या विषयावर लिहायला सांगितले तेव्हा मला माझ्या पहिल्या नाटकाच्या आधीचा प्रसंग आठवला. तोच मी आता तुम्हाला सांगणार आहे.

त्या वर्षी आमचं दवबिंदूंचं नाटक होतं. तेव्हा मी फक्त दुसरीत होते. आमचे डायलॉग खडखडीत पाठ होते. सरावही छान झाला होता.

नाटकाच्या दिवशी माझा मेकअप वगैरे झाला, मी तयार होऊन बसले होते. आमच्या आधीचं नाटक सुरू झालं. माझी स्टेजवर जाण्याची वेळ जवळ आली. पहिलाच डायलॉग माझा होता. मला अचानक उलटी होणार की काय असं वाटायला लागलं. बेसीनपाशी जाता जाता मला वाटलं की आता मला चक्कर येणार. मी मटकन खाली बसले आणि ढसाढसा रडायलाच लागले. सावनीताईने मला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. तिने मला लिंबू सरबत दिलं पण तरीही मी रडतच होते.

मग स्वातीताईने माझ्या आईला बोलावले. आई आली आणि तिने पण मला समजावण्याचा बराच प्रयत्न केला. पण तरीही मी रडतच होते आणि मला असं वाटत होत की आता मी काही नाटकात काम करू शकणार नाही. मग आईने माझ्या कानात सांगितलं की जर मी नाटकात छान काम केलं तर ती मला माझ्या आवडीची दोन पुस्तकं घेऊन देईल.

मग काय, हे ऐकताच मी तरतरीत झाले. खणखणीत आवाजात माझे डायलॉग म्हणत व्यवस्थित धीटपणे काम केले. यानंतर आईने मला पुस्तके तर घेऊन दिलीच, पण सर्वांकडून मोठ्ठी शाब्बासकीदेखील मिळाली.

हा प्रसंग मला तरी वाटत नाही की मी कधी विसरेन!

**ऋजुल अष्टेकर**



# आमच्या नजरेतून प्रेरणा

काय आहे प्रेरणा? नुसती कार्यशाळा? नाट्य शिबिर? नाही, प्रेरणा हे एक गुरुकुल आहे. योग्य वयात योग्य संस्कार करणारे गुरुकुल.

राधा-सखीला प्रेरणाच्या उन्हाळी शिबिराला घालताना मी जास्त विचार केला नव्हता. मी स्वत: लहानपणी बालनाट्यातून काम केलं असल्यामुळे मुलींनी तेसुद्धा जग बघावं एवढी इच्छा होती पण प्रेरणामध्ये दाखल झालो आणि कधी सगळे प्रेरणामय झालो कळलेच नाही. मग सुरू झाला एक सुंदर प्रवास. राधा-सखीच्या जडणघडणीमध्ये प्रेरणाचा आणि प्रेरणाच्या स्वातीताईचा फार मोठा वाटा आहे. या धावपळीच्या युगात पालक प्रत्येक गोष्ट मुलांना देऊ शकतात असं नाही पण ते नक्कीच अशा ठिकाणी मुलांना घेऊन जाऊ शकतात जिथे त्यांना योग्य त्या गोष्टी मिळतील. नशीबाने प्रेरणाची आणि माझी ओळख झाली आणि राधा-सखी बद्दलची काळजीच मिटली.

सध्याच्या काळात प्रेझेंटेशन ही अत्यंत गरजेची गोष्ट आहे. माझ्या मुली नाटकात काम करून त्यामध्ये करिअर करतील असा विचार न करता सध्याच्या काळाची गरज ओळखून त्यांना लोकांसमोर बोलता यावं, मुद्दे मांडता यावेत असा विचार करून आम्ही दोघांनी मुलींना प्रेरणामध्ये घातलं. प्रेरणामुळे त्यांच्यामध्ये नुसता सभाधीटपणा आला नाही तर त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलत आहे, बहरत आहे. योग्य-अयोग्य यांची निवड करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आली आहे. मला आवडलेला सर्वात महत्त्वाचा मुद्दा प्रेरणा मधला म्हणजे निकोप स्पर्धा. सर्वजण एक टीम म्हणून काम करतात. मग टीममधील काही जण ऑनस्टेज असतील किंवा काही बॅकस्टेजला. प्रत्येक काम तेवढेच महत्त्वाचे आहे हे सर्वांनाच मान्य असते. सर्वजण नाटक बसवतानाची प्रोसेस खूप एन्जॉय करतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वातीताई.... तिच्यावरील मुलांचा विश्वास हा आपल्या आई-वडिलांवर असणाऱ्या विश्वासा एवढाच असतो. आम्ही पालक सुद्धा प्रेरणाला मुलांना सोडल्यावर निर्धास्त असतो. आपले पाल्य अतिशय योग्य व्यक्तीच्या हाती आहे, ही भावनाच खूपच समाधान देणारी आहे. प्रेरणाची पूर्ण टीमच छान आहे. अत्यंत निस्वार्थी हेतूनी स्वातीताई मुलांच्या प्रगतीकरता झटत असते. मुलांना सकारात्मक पद्धतीने विचार करायला शिकवून त्यांचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच तिने बदलला आहे. स्वातीताईच्या या सर्व उपक्रमात श्रीरामकाकांची भक्कम साथ आहे. स्वातीताई, श्रीरामकाका, सावनी, मुलं आणि पालक सगळं मिळून एक कुटुंबच आहे. हे कुटुंब असेच वाढत जाईल ही खात्री आहे. प्रेरणाच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी माझ्या शुभेच्छा!

**जुईली कुलकर्णी**





## प्रेरणेचा शोध घेताना

घ्यावी प्रेरणा तर ती कोणाकडून?
तुझ्याकडून, माझ्याकडून की आई-बाबांकडून?
घ्यावा ध्यास तर तो कोणाकडून?
मित्रांकडून, सख्यांकडून की नातेवाईकांकडून?

ताईचं नृत्य ही प्रेरणा, का दादाची जिद्द ही प्रेरणा?
आईचा स्वयंपाक ही प्रेरणा, का बाबाचं काम ही प्रेरणा?

नक्की प्रेरणा असते काय?
त्यांनी आपल्यात बदल घडतो काय?

दुसऱ्यांचा आनंद ही प्रेरणा, हरून जिंकणं ही प्रेरणा,
बलिदान देणं ही प्रेरणा,
चांगल्या कामासाठी स्वत:ला वाहून टाकणं, ही प्रेरणा.
मग प्रेरणा असते कोणात?
एका माणसांत, की चार माणसांत?

प्रेरणा असते प्रत्येकात!
ज्या आज्जींच्या आनंदाश्रूंमध्ये प्रेरणा आहे
त्या पोलीसकाकांच्या बलिदानामध्ये प्रेरणा आहे
त्या मुलाच्या अभ्यासात प्रेरणा आहे, तसंच
आपल्या स्वातंत्र्यवीरांकडे प्रेरणा आहे.

खरंतर आपल्यातसुद्धा प्रेरणा आहे,
अरे आधी आपल्याला उघडून बघा
स्वत:ला पारखून बघा
पेटेल ठिणगी प्रेरणेची जेव्हा
तेजाने दिपून जाईल जग तेव्हा!

**राधा सं. कुलकर्णी**



## प्रेरणा म्हणजे...

प्रेरणा म्हणजे...
डौलदार झाड आनंदाचे,
ज्याला 'फुलण्यात मौज' नेहमीच वाटे
त्याच्या पानांवर चमकती 'थेंब' दवाचे
जसा 'कवडू' कोवळ्या उन्हातून वाट काढत येई
तशी पाखरांना पण हलकेच जाग येई
आणि मग, 'प्रयोग क्रमांक १' सुरू होई
मग मोठे पक्षी गगनात 'झेप' घेती
आणि छोटे घरट्यातून डोकावून पाहती,
खाली पसरलेले 'दगड' रंगीत,
तर कधी ऐकू येई 'अक्षरवाटां'वरचे मंद संगीत
'फंटूश' 'G1ww, ' 3 days 2 nights'
म्हणत ते खेळू लागती
'कौन बनेगा कचरापती'
खेळ पाहून 'पाऊस पैंजण' वाजवत भिजवून टाकी सर्वांना
भिजलेली पिले बिलगती आजोबांना,
मग पिले होती गुंग 'आजोबांची गोष्ट' ऐकताना
'उडून गेलेल्या चिमण्यांना' लागती परतीचे वेध,
कारण त्यांना हवीहवीशी वाटे 'पु. ल. आजोबां'ची ग्रेट भेट!
जेव्हा हे झाड तपपूर्ती साजरी करताना स्वत:चे
'प्रतिबिंब' न्याहाळते
तेव्हा ते सर्वांसाठी प्रेरणादायी ठरते.

**सोनिया प्रसन्न केतकर**



# माझी खिडकी माझे आकाश

बऱ्याच दिवसांनी आज मी माझ्या खोलीतल्या खिडकीमध्ये बसले. त्या खिडकीमधून मला बाहेरचे स्वच्छ, सुंदर, मोकळे, निळेशार आकाश दिसले, उडणारे पक्षांचे थवे दिसले, आणि ढगांआडून प्रकाश देत सूर्य उगवताना दिसला. मन प्रसन्न झालं. रात्र संपली आणि नवीन सुरुवात करणारा दिवस उजाडला.

विचार करत असताना, मला हे लक्षात आले की हीच खिडकी व हेच आकाश माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. लहानपणापासून आई-बाबांच्या मदतीने व त्यांच्या साथीने, मी फक्त दहावी-बारावीच नाही तर बारावीनंतरच्या प्रवेश परीक्षेपर्यंतचा प्रवास पूर्ण केला. ती माझी खिडकी होती. आई-बाबा नेहमी सांगायचे आम्ही एका विशिष्ट वेळेपर्यंत आहोत, त्यानंतर आम्ही तुला फक्त पाठिंबा देऊ शकतो. बाकी तुला तुझे आयुष्य स्वतःच जगायचं आहे. तुझ्या अडीअडचणीला आम्ही आहोतच पण ही खिडकी ओलांडून बाहेरचे आकाश जिंकायचे आहे, बाहेरचे जग समजून घेऊन जगायचे आहे. समोर येईल त्या अडचणींना तोंड देत, परीक्षेला सामोरे जात जीवन जगायचे आहे.

आजवर आई-बाबांच्या छत्रछायेत होते पण आता मी कॉलेजात जाणार आहे. आता खऱ्या अर्थाने मला माझे आकाश विस्तारलेले दिसणार कारण आजपर्यंत आई-बाबा सांगत होते तेच माझे आकाश होते पण आता मला या खिडकीतून बाहेर पडून स्वतःचे विश्व निर्माण करायचे आहे. शाळेत असताना शिक्षक, आई-बाबांच्या बरोबरीने साथ देत होते पण आता शिक्षकांची उणीव भासते. स्वतःच्या अभ्यासाच्या बळावर परीक्षा द्यायच्या असतात. पुढे कॉलेज संपल्यावर नोकरीसाठी वणवण भटकावे लागते. नोकरी मिळाल्यावर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली काम करावे लागते. चुकून काही चुकले तर ओरडा आणि टोमणे सगळेच झेलावे लागते. त्या वेळी ना कोणाचा आधार असणार ना कोणी मार्ग दाखवणार. मनोबल वाढवायला आई-बाबा असतील तरीपण या सगळ्याचा परिणाम म्हणून नैराश्य आणि एकटेपणा येतोच, पण खचून न जाता धैर्याने उभे रहायची जिद्द आणि चिकाटी हवी, आणि माझ्या ती अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन, अपार कष्ट करेन. कोणतेही कार्य असो वा कोणताही व्यवसाय असो सर्वांसमोर अडचणींचे डोंगर उभे रहातातच पण ते डोंगर सर करण्याची धमक आपल्यात सामावून घेतली पाहिजे. उंच भरारी घेताना भावनांचा लपंडाव सुरू होतो, अडथळे येतातच पण आत्मविश्वासाचा डोंगर सर करता यायला हवा. या सर्वांने मन चलबिचल होते, मन भरून येते आणि भीती वाटते.

पण निराशेच्या घोर अंधाराकडून, उदासीनतेच्या ढगाआडून, क्षितिजाच्या वाटेवर प्रकाशाचे दुर्मिळ किरण दिसून येतात व नव्या उमेदीने, हुरूप घेऊन उगवणारा सूर्य प्रत्येक दिवशी नवी शिकवण देऊन मावळतो आणि पुन्हा मन हर्ष उल्हासित करून झेप घेणाऱ्या थव्याकडे वळवतो.


असे हे माझे आकाश, मला माझ्या खिडकीतून झेप घ्यायला खुणावते आहे.

**मिताली सरलष्कर**



# Sandip Kulkarni Farmhouse

## Weekend stay @ Pattan Kodoli, Kolhapur




Farmhouse stay for a group of families to spend a weekend together or for a workshops or corporate offsite meetings or events. This farmhouse is surrounded by 6 acres of private land actively farmed for vegetables and sugar cane. The staff is provided as required for housekeeping and food services. Entire venue will have only one guest / group of families at a time.

**Note:** This is not a commercial venue. This is available only for guests with references. The cost can be customized as per the need. This is recommended for group of families up to 15 people.

**WhatsApp Contact # +91 9923063823 - Juilee Kulkarni**



# शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी, आता मदत जनता बँकेची!

## जनता एज्युफ्लेक्स कर्ज योजना

मान्यताप्राप्त संस्थेचे कोर्स / डिग्री / डिप्लोमा
तसेच हॉस्टेल फी / संगणक व साहित्य खरेदी
इत्यादींसाठी अर्थसहाय्य

**देशांतर्गत विद्यापीठांसाठी ₹ 10* लाख**

**परदेशी विद्यापीठांसाठी ₹ 20* लाख**

विशेष सवलतीचा आकर्षक व्याजदर

ड्रायपीरिएडसह जास्तीतजास्त १० वर्षे कर्जमुदत

*अटी व नियम लागू

• नेट बँकिंग • मोबाईल बँकिंग (IMPS) • एनी ब्रँच बँकिंग • एटीएम • परदेशी चलन विनिमय

# जनता सहकारी बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९



# बहुपेडी नातं!

'दहा, नऊ, आठ, सात...' अशी मोजणी कार्यशाळेत चालू झाली की पटापट मुलं एकत्र येतात आणि मग चालू होतो मुलांशी सुसंवाद... स्वातीताईचा! प्रत्येक तालमीनंतर, रंगमंचीय खेळानंतर किंवा दिलेल्या कुठल्याही activity नंतर ताईचं बोलणं ऐकणं म्हणजे मुलांसाठी एक आनंददायी अनुभव. अतिशय प्रेमाने, सकारात्मक पद्धतीने ताई झालेल्या किंवा केलेल्या चांगल्या आणि वाईट, दोन्ही गोष्टींबद्दल मुलांशी बोलते. कित्येकदा कार्यशाळेची वेळ संपून गेली तरी हा संवाद चालू असतो. आम्ही पालक बाहेर थांबलेलो असतो. पण आम्हालाही 'हा संवाद तोडायचा नसल्यामुळे कितीही उशीर झाला तरी काहीच वाटत नाही, आणि मुलं तर कार्यशाळेतून बाहेर यायलाच तयार नसतात. अशा अनेक संवादांमधून स्वातीताई आणि मुलांमध्ये एक प्रकारचं बहुपेडी नातं तयार झालं आहे. हे नातं बहुपेडी अशा अर्थाने आहे की त्यात प्रेम, जवळीक, आपुलकी, आदर अशासारख्या मऊ, नाजूक धाग्यांच्या बरोबरीने वयानुरूप लागणारे धाक, शिस्त हे धागे सुद्धा आहेत. मुलांसाठीचे उपक्रम ही गोष्ट 'प्रेरणा'मधे नुसती कागदावर न राहता प्रत्यक्षात आलेली असते. ताई मुलांना देत असलेली समानतेची वागणूक, त्यांच्या मतांना देत असलेले महत्त्व, वेगळा विचार करण्याची (Out of the box thinking) आणि प्रत्येक निर्णय समजून उमजून घ्यायची लावलेली सवय आणि अशा अनेक गोष्टी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या अनेक मूल्ये शिकवून जातात. शनिवारच्या सत्रामध्ये सादरीकरणासाठी मुलांना दिलेले विषय आणि त्यावर मुलांना विचार करायला लावणारं तिचं भाष्य, सादरीकरणावर किंवा दिलेल्या Excercise वर लिहून ठेवलेल्या तिच्या कॉमेंट्स ही सर्व प्रोसेस मुलांची वाढ होण्यासाठी खूप महत्त्वाची असते. नाटक ही गोष्टच मुळी टीमवर्क आहे आणि एकमेकांच्या सहकार्याशिवाय रंगमंचावर काहीही सादर करणे ही गोष्ट मुलांच्या मनात एवढी रुजलेली आहे की आपल्या इतकंच आपल्या मित्रमैत्रिणींचं कामपण चांगलं होण्यासाठी मुलं झटत असतात. एखादा प्रयोग यशस्वीपणे सादर झाल्यानंतर पडदा पडत असताना प्रत्येक मुलाला, मार्कस् किंवा ग्रेडस यामध्ये न मोजता येणारा आनंद आणि यश म्हणजे काय हे अनुभवायला मिळतं. एखाद्या सादरीकरणावर काम करताना, त्याच्या प्रोसेसवर 'प्रेरणा'मध्ये खूप विचार केला जातो. सुरुवातीपासून मुलांचा त्यात सहभाग असतो. मुलं जे जे सुचवतात ते 'ताई' अगदी लक्षपूर्वक ऐकते. मुलांशी तिच्या असलेल्या नात्याचं अत्युच्च शिखर म्हणजे मुलं रंगमंचावर असताना, न बोलता मुलांना मानसिक पाठबळ देण्यासाठी विंगमध्ये उभी असलेली स्वातीताई! प्रयोग संपल्यानंतर त्यांच्या Achievement कडे डोळे भरून पाहणारी त्यांची, आणि फक्त त्यांची स्वातीताई!

हे असे अनेक क्षण स्वातीताई आणि मुलांचं नातं अधिकाधिक घट्ट करत असतात.

**नेहा सुगवेकर**







# संवेदनेचा जन्म

माझा जन्म झाला तेव्हा मी रडले का? आठवत तर नाही, पण रडले असणार नक्कीच! त्या रडण्यामागचं कारण आठवत नाही म्हणून रडणंही आठवत नसावं बहुदा. ते रडणं म्हणजे पहिली वेदना आणि तिच्यातून जन्मलेली पहिली संवेदना... पण हळूहळू वेदनेचा स्पर्श बोथट होत गेला असावा आणि म्हणून संवेदना सवयीची होत गेली असावी. आणि म्हणूनच ते सगळं विस्मरणात गेलं असावं.

खरंच संवेदना नीट समजून घेतली असेन का मी? की माझ्यातल्या प्रत्येक स्पंदनालाच संवेदना समजले मी? खरंच स्पंदन म्हणजेच संवेदना का? की वेदना म्हणजे संवेदना? संवेदना काय आहे नक्की? किंवा तिचा जन्म नक्की कशातून होत असावा? तिचा जन्म स्पंदनातूनही होतो आणि वेदनेतूनही. किंबहुना स्पंदन आणि वेदना ह्यांच्या मीलनातून संवेदना जन्म घेत असावी.

या संवेदनेची जडणघडण होत असावी. जसे तिचे दरवाजे हळूहळू एकापाठोपाठ मी उघडत गेले तसे तिच्यात बदल घडत गेले. पण एक असा दरवाजा उघडून मी आत्ता ज्या प्रदेशात आलेय, इथे जे बदल झालेत, होतायत ते याआधी झाले नव्हते. हे बदलही फार वेगळे आहेत आणि हे जगही... हे जग एकाचवेळी खेचूनही घेतं पण तेच ढकलूनही देईल की काय अशी भीतीही वाटते. क्षणाक्षणाला बदलणाऱ्या स्पंदनांचे, वेदनांचे लोटच्या लोट आहेत इथे, सारखी बदलत जाणारी चित्रं आहेत. ती चित्र प्रत्येक इंद्रियाला चाटून जातात. कितीतरी नव्या वेदना, नवी स्पंदनं आहेत. त्यांचा आवेगही इथे खूप जास्त आहे. या कल्लोळात हरवून जाताना वाटतं की माझीच संवेदना माझ्यापासून दूर जातेय की काय? पण एवढं माहितेय मला की ती दूर गेली तरी हरवणार मात्र नाही या कल्लोळात. ती आहे माझ्याबरोबर. तिची बदलत जाणारी रूपं हीच तिची ओळख आहे. एकाच रूपात बांधून ठेवलं तिला तर मात्र कायमची अनोळखी, परकी होईल हे समजलंय मला आता. मला अजून अजून दारं उघडायची आहेत आणि येणाऱ्या प्रत्येक जगात हरवून जात माझ्यातल्या संवेदनेचा न संपणारा शोध घ्यायचाय, अगदी मोकळेपणाने...

ही गोष्ट फक्त माझी नाही. जगात आलेला, आलेली प्रत्येक 'मी' रडतेच ना... ही संवेदना प्रत्येकाच्याच ओळखीची आहे. फक्त तिला ह्या ओळखीत अडकवून न ठेवता तिला बहरू देणं, तिच्याबरोबर विहरता यायला हवं. संवेदनेला जन्मू द्यायला हवं... तिला हव्या तितक्या वेळा !

**सई लिमये**





# माझ्या स्मरणातली प्रेरणा

२००४ साली माझी स्वाती ताईशी पहिली ओळख झाली. टिळक रस्त्याच्या गिरीजा हॉटेल जवळ एक practice Hall होता. तिथे ताईने पहिली वहिली नाट्य कार्यशाळा घेतली होती. तेव्हा प्रेरणा-एक कलामंच ही संस्था स्थापित व्हायची होती.

कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी ताईने मुलांच्या auditions घेतल्या होत्या. मी त्या वेळेस साधारण ४थ्या इयत्तेत होतो. मला अंधुकसं आठवत आहे ते म्हणजे, एक stage होतं, तिथे ताई बसली होती आणि एक एक व्यक्ती तिच्या समोर जाऊन आपलं सादरीकरण करून दाखवत होती. माझी वेळ आली आणि मी तिच्यासमोर एक कविता सादर केली. सादरीकरण झालं आणि तिने मला एक कौतुकाची थाप दिली, तिच्या डोळ्यांत तेव्हाही तीच माया आणि आपुलकी होती. बस, मला तेव्हाच वाटलं की आपण ही कार्यशाळा करायलाच हवी. शेवटी निकाल लागले, माझं selection झालं आणि कार्यशाळेला सुरुवात झाली.

या कार्यशाळेदरम्यान अनेक मुला-मुलींशी मैत्रीही झाली. तेव्हा प्रत्येकजण ताईला वेगवेगळ्या नावांनी हाक मारे. कोणी मॅडम, कोणी मिस, कोणी दीदी तर कोणी ताई. शेवटी सर्वानुमते ताई म्हणायचं ठरलं. अनेक Games, exercises, ice-breaking sessions अशा Theatre शी निगडीत अनेक गोष्टी ताईने घेतल्या आणि आम्हाला कलाकार म्हणून समृद्ध तर केलंच पण माणूस म्हणूनही आमच्यातल्या संवेदना जाग्या केल्या.

ताईने नाटक म्हणजे फक्त मनोरंजनाचं एक माध्यम एवढंच न ठेवता, त्यातून आपले आचार विचार- एखादा आशय उत्तम रीतीने कसा मांडायचा याचेही धडे दिले. माझं बालपण समृद्ध करण्यामागे प्रेरणाचा खूप मोठा हात आहे. मला समविचारी आणि जिवाभावाचे मित्र-मैत्रिणी लाभले. संस्थेकडून मी अनेक नाटकं केली, काही नाटकांना बक्षीसंही मिळाली, कौतुकाची थाप प्रेक्षकांकडून मिळाली, तरीही इतकं सगळं झाल्यावर आपले पाय जमिनीवर कसे ठेवायचे हे ताईने शिकवलं.

आपल्या संस्थेचं खूप मोठं वैशिष्ट्यं हे आहे की इथल्या प्रत्येक व्यक्तीचं प्रत्येक व्यक्तीवर जीवापाड प्रेम आहे. मग ते मावश्या असोत, ताई असो, श्रीराम काका असो किंवा विद्यार्थी असोत, प्रत्येकजण एकमेकांना धरून मोठा होत आहे.

नाटकांच्या processes मधून आम्ही व्यक्ती म्हणून खूप सुधारत गेलो. Improvisations मधून आमच्यातली spontaneity वाढली. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे stage fright आणि आत्मविश्वास बळावला. माझी शाळा आणि माझं महाविद्यालयीन शिक्षण इंग्रजीत झालं असलं तरीही माझा मराठीचा शब्दसंचय समृद्ध करण्यामागे प्रेरणाचा खूप मोठा हात आहे.

आजही एखादी संहिता सुचली, कुठली मनातली गोष्ट बोलून दाखवावीशी वाटली तरी ताई आपल्या व्यस्त schedule मधून वेळ काढून मला भेटते तेव्हा खरंच खूप आनंद होतो. आता हळू हळू आपल्या वैयक्तिक कामांमुळे संस्थेत actively सहभागी होणं शक्य होत नाही, परंतु जेव्हा केव्हा संस्थेत जातो तेव्हा आपुलकीने स्वागत होतं.

अभिनय, लेखन, दिग्दर्शनात आपलं career करायचं या मधला confidence देण्यामागे संस्थेचा मोठा वाटा आहे. कळत नकळत संस्थेने आणि ताईने मला व्यक्ती म्हणून खूप समृद्ध केलं आहे. संस्थेच्या या तपपूर्ती सोहळ्याचा भाग असल्याचा मला खूप आनंद होतोय. सर्वांच्या आशीर्वादाने आणि प्रेमाने संस्थेचा हा प्रवास असाच चालू राहील. सर्वांना खूप खूप प्रेम.

**पार्थ केतकर**





# अक्षरवाटा

प्रेरणाच्या एका बैठकीमध्ये स्वातीताईनी मुलांना आणि पालकांना आवाहन केलं की ज्यांना वाचायची आवड आहे त्यांनी वाचन संस्कृती जपण्यासाठी, वाढवण्यासाठी एकत्र येऊया. वार आणि वेळ ठरली बुधवार संध्याकाळ! नोव्हेंबर २०१५ ला संध्याकाळी स्वातीताई, श्रीराम सर, सावनी, अमोघ, मी आणि माझी मुलगी सई असे अगदी काहीच लोक जमलो आणि अक्षरवाटा उपक्रमाला सुरवात झाली. मुक्ता आणि वृंदा लिमये, जुईली कुलकर्णी याही मग सामील झाल्या.

वाचन म्हणजे माझ्यासाठी जीव की प्राण! २-३ दिवस जरी काही वाचलं नाही तरी चुकल्या चुकल्या सारखं वाटणारी मी, माझ्यासाठी तर हा उपक्रम म्हणजे पर्वणीच! या निमित्ताने नियमितपणे वाचलं जाईल, विचारांची देवाण घेवाण होईल हा तर हेतू होताच शिवाय माझी मुलगी सई तेव्हा ७वी त होती. तिला वाचनाची आवड लागावी, तिने बहुश्रुत व्हावं अशी पण इच्छा होतीच ! हे दोन्ही साध्य झाले ते अक्षरवाटामुळे. काही कारणांनी आम्ही नियमितपणा तेव्हा राखू शकलो नाही पण प्रत्येकाच्या व्यग्र दिनक्रमातून जसं जमत होतं तसं भेटणं आणि त्या भेटीत वाचलेल्या पुस्तकांबद्दल चर्चा हे चालूच होतं

जुलै २०१८ पासून मात्र प्रेरणाचा अक्षरवाटा उपक्रम खऱ्या अर्थाने बहरला आहे. अगदी वयाच्या १४ व्या वर्षांपासून ते सेवानिवृत्त झालेले, विविध व्यवसायातले, वेगवेगळ्या साहित्य प्रकारांची आवड असणारे असे जवळजवळ २२ वाचनप्रेमी आता या वाटेचे पांथस्थ आहेत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी संध्याकाळी आम्ही प्रेरणाच्या ऑफिसमध्ये २ तासांसाठी भेटतो. सुरवात एखाद्या कवितेच्या वाचनाने होते, त्यानंतरची १५ मिनिटे आणि शेवटची १५ मिनिटे आमच्यातलेच दोन वाचनप्रेमी एखाद्या पुस्तकावर सविस्तर बोलतात. मधल्या वेळात उपस्थित सर्व जे वाचले आहे त्याविषयी थोडक्यात सांगतात, उल्लेख केलेल्या प्रत्येक पुस्तकाच्या नावाची, लेखकाची नोंदवहीत नोंद केली जाते. पुस्तक, साहित्य याशिवाय इतर विषयांना इथे थारा नसतो, आणि तरीही प्रत्येक भेट खूप काही शिकवणारी, समाधान देणारी असते! अक्षरवाटाच्या प्रत्येक भेटी नंतर आम्ही सगळेच अधिक समृद्ध होत, आनंदाच्या डोही तरंगत घरी जातो ते पुढच्या वेळी काय काय नवीन ऐकायला मिळणार आहे याची उत्सुकता मनी बाळगतच!

तुम्ही कधीपासून येताय ?

**मेधा पुरकर**





।। श्री स्वामी समर्थ ।।



## प्रेरणाच्या तपपूर्ती निमित्त अभिनंदन
## आणि पुढील वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा...

शुभेच्छुक

## हॉटेल वैष्णवी आणि आर्यश्री फूडस्

बल्लाळेश्वर पार्किंग शेजारी, श्री क्षेत्र अष्टविनायक पाली, खोपोली, जि. रायगड

लॉजिंग व व्हेज जेवणाची उत्तम सोय

***घरापासून दूर पण घरासारखेच...***

अधिक माहितीसाठी संपर्क – श्री. जोशी

९२२५६५०६१३, ९८२२०२९७११, ९९२२८६०१७१

आम्ही **Online booking** स्विकारतो






# पुस्तकांसोबत वाढताना

वाचन या विषयावर लिहायचं म्हणजे मनाच्या अगदी आतलं समोर मांडून ठेवण्यासारखं आहे. मी वाचायला कधी लागले हे काही मला आठवत नाही पण या वाचनामुळे झालेले अगणित किस्से, त्यासाठी खाल्लेली बोलणी मात्र स्वच्छपणे आठवतात. पुस्तके माझ्या आयुष्यात खूप लहानपणीच आली ती माझ्या आईमुळे. तिने मला खूप पुस्तके उपलब्ध करून दिली. वाचनालयातून पुस्तके वाचणे आणि त्यासाठी स्वस्त वाचनालये शोधून काढणे यात तिचा हातखंडा होता. पु. ल. देशपांडे आणि व. पु. काळे हे बाल साहित्यानंतर मी वाचलेले पहिले लेखक. त्यावेळी मी बहुदा १० किंवा ११ वर्षांची असेन. त्यानंतर इतर कोणती भाषा येईपर्यंत हाताला लागतील तेवढी मराठी पुस्तके, किंवा असे म्हणावे लागेल की जे काही हाताला लागेल ते वाचत होते. त्यात वि. स. खांडेकर, रत्नाकर मतकरी, गो. नि. दांडेकर, ह. ना. आपटे, जी. ए. कुलकर्णी इ. नामवंत लेखकांचे साहित्यदेखील वाचनात आले. जसे जसे शाळेचे दिवस संपून पुढील शिक्षणाचे दिवस सुरु झाले तसे वाचनही वाढत गेले. जशी इंग्रजी भाषेशी ओळख झाली तशी इतर भाषेतील पुस्तके काय म्हणतात त्याची उत्सुकता वाढली. त्याची सुरवात फ्रेडरिक फोरसिथ, डॅनिएल स्टील, जेफेरी आर्चर यांच्यापासून सुरु होऊन कधी ऑस्कर वाईल्ड, चेकॉव्ह, आर्थर कॉनन डॉयल, पर्ल बक यांच्यापर्यंत पोचले ते कळलंच नाही. काही रशियन, जपानी आणि चिनी पुस्तकांची उत्तम भाषांतरे हाती लागली आणि त्या एका वेगळ्याच असणाऱ्या जगाचीसुद्धा ओळख झाली. प्रत्येक क्रांती रोजच्या जगण्याची कशी लक्तरे करून जाते ते या आणि अशाच काही पुस्तकांतून पाहायला मिळाले. इतिहास हा जेत्याच्या बाजूने कसा लिहिला जातो ते अनेक पुस्तकांतून समजले. अशा दिग्गज लेखकांची ओळख झाल्यावर वाचनाचं क्षितिज रुंदावत गेलं. अशा महान लेखकांचे त्यांच्या मूळ भाषेतील लिखाण समजण्याएवढे इंग्रजीचे ज्ञान तेव्हा चांगले नसल्यामुळे अशा पुस्तकांचे मराठी अनुवाद शोधून वाचण्याचे वेडच एका काळात मला लागले होते. फक्त इंग्रजीच नाही तर अनेक भारतीय भाषा आणि परदेशी भाषांमधील साहित्य मराठीमध्ये उपलब्ध होतं. आपल्याच कितीतरी मराठी लेखकांनी इतर भाषांमधील साहित्य मराठीत आणून ठेवले आहे. त्यात पु. ल. देशपांडे, जी. ए. कुलकर्णी, उमा कुलकर्णी, रवींद्र गुर्जर, चेतना सरदेशमुख, मंगला निगुडकर अशी अनेक नावे देता येतील. या सगळ्यांमुळे वेगवेगळ्या संस्कृतींची ओळख झाली. प्रत्यक्ष त्या त्या देशात जाणे शक्य नसले तरी पुस्तकांमधून मारलेला फेरफटकासुद्धा पुरेसा अनुभव देऊ शकतो.

पुस्तकांचं बरं असतं, त्यात शिरलं की आपल्याला विना खर्च, विना परवाना कुठेही जाता येतं, कुठलेही नियम नाहीत की अटी नाहीत. हॅरी पॉटर बरोबर जादुई दुनियेत हरवून जाता येतं, हिटलर बरोबर त्याची जीवनगाथा बघता येते, शिवाजी महाराजांचे मावळे बनून अख्खा सह्याद्री पालथा घालता येतो तर तोत्तोचान बरोबर तिच्या शाळेत जाऊन बसता येतं. या सगळ्या लोकांबरोबर, इतक्या वेगवेगळ्या काळामधून प्रवास करताना, आपल्या भौतिक जीवनातील मर्यादा पार करून आपण ते सगळं अनुभवतो, त्या पात्राशी एकरूप होऊन जातो. एकाच आयुष्यात अनंत आयुष्य जगण्याची संधी ही पुस्तकं आपल्याला देऊ पाहतात, आपण फक्त त्यांच्या जगात पाऊल ठेवायचा अवकाश.

पुस्तक वाचताना त्यात हरवून जाण्याची प्रत्येकाची स्वतःची एक खास पद्धत असते. त्याची मजा फक्त तशाच पुस्तकवेड्या लोकांना कळू शकेल. त्यासाठी अशी वेडी लोकं एकत्र भेटायला हवीत. अक्षरवाटाने मला ती जागा आणि ती लोकं मिळवून दिली. वाचलेले पुस्तक आणि त्यावेळी जे काही वाटतं ना ते कोणाशीतरी वाटून घ्यावेसे वाटते. आपल्याला जे वाटलं ते सांगणं ही तर प्रत्येकाची गरज असतेच पण समान आवड असणाऱ्या लोकांबरोबर जो संवाद होतो तो फार समृद्ध करणारा असतो. इतरांचे अनुभव ऐकणे हे सुद्धा अक्षरवाटाच्या सत्राची वाट बघण्याचे एक कारण आहे माझ्यासाठी. अक्षरवाटा हे एक माध्यम आहे जिथे आम्ही पुस्तकांच्या जगात शिरलो की बाकी जगाचं अस्तित्व विसरून जातो.

'अक्षरवाटा'चा उपक्रम हा माझ्यासारख्या वाचनवेड्यांसाठी तर आहेच पण मला असेही वाटते की ज्यांना वाचन सुरु करायचे आहे तितकाच त्यांच्यासाठी देखील आहे. पुस्तकांबद्दल आणि वाचनाबद्दल कितीही लिहिले तरी कमीच आहे. पण अक्षरवाटासारख्या उपक्रमातून मिळालेले अक्षरमित्र अमूल्य आहेत हे तरी मला इथे नमूद केलेच पाहिजे.

**गौरी अष्टेकर**



# प्रतिबिंब

फार्महाऊस बांधल्यानंतर 'प्रेरणा'च्या मुलांना घेऊन तिकडे जायचे हा संदीपचा (माझे पती) विचार आणि 'प्रेरणा'च्या मुला/मुलींचे निवासी शिबीर घ्यायचे हा स्वातीताईचा विचार यातून 'प्रतिबिंब'चा जन्म झाला. निसर्गाच्या सान्निध्यातील स्वत:चा शोध हा प्रतिबिंबचा मूळ उद्देश. आज ३ वर्षात ५ शिबिरं झाल्यानंतर मी हे ठामपणे सांगू शकते की, 'हो' प्रतिबिंब माणसाचे आयुष्य घडविते.

'पट्टणकोडोली' या गावात आमच्या मळ्यात फार्महाऊस बांधताना संदीपच्या डोक्यात फक्त एक घर बांधायचं एवढंच होतं. नंतर त्या घराचं कॅम्पसाईटमध्ये रूपांतर कधी झालं कळलंच नाही. कोल्हापूर पासून १७ किलोमीटर अंतरावर असलेलं आमचं 'पट्टणकोडोली' हे गाव. या गावात आमचा मळा आहे. संदीपच्या दूरदृष्टीतून आणि जितेंद्र दादांच्या (माझे दीर) निगराणीतून तो मळा आता फुलला आहे. बहरला आहे. मळ्यामध्ये नेमानी पीक घेत असल्याने रोज माणसांचा राबता आहे. मळा गावाच्या जवळ असून सुरक्षिततेच्या दृष्टीने एकदम योग्य आहे.

पहिलं 'प्रतिबिंब' २०१७ ला मे महिन्यात झालं. सुरुवातीला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. निसर्गाचं रौद्र रूप सुद्धा अनुभवलं. पण जेव्हा प्रतिबिंब संपायची वेळ झाली तेव्हा मुलं रडायलाच लागली आणि आम्हाला खात्री पटली की आम्ही जे काही द्यायचा प्रयत्न केला आहे तो यशस्वी झाला आहे. आता सलग ३ वर्षे झाली आणि दिवसेंदिवस प्रतिबिंबाच्या यशस्वीततेची खात्री पटते आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुठेही पेपरमध्ये किंवा सोशल मिडीयावर जाहिरात न करता, फक्त प्रेरणाच्या मुलांशी आणि पालकांशी संपर्क करून माहिती दिली तरी या वर्षी एका शिबिराची ३ शिबिरं झाली आणि काही रिपीट मुलं तर काही नवीन मुलं सर्वांनीच पुढच्या वर्षी पुन्हा भेटू हे आश्वासन दिलं. पुस्तक कसं वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर नवीन कळतं तसंच प्रतिबिंबचं होत असावं.

आजच्या या मोबाईल आणि मीडियाच्या काळात सलग पाच दिवस टीव्ही आणि मोबाईल शिवाय मुलं राहू शकतात आणि ते सुद्धा आनंदाने हे प्रतिबिंबनी दाखवून दिलं. सकाळी ५.३० ला सुरू होणारा आमचा दिवस रात्री ९:३० ला गुडूप होतो. तेव्हा हीच का ती मुलं जी पुण्यात रात्री साडेअकरा शिवाय झोपत नाहीत ही शंका माझ्यासुद्धा मनात येते. आजची आपली तक्रार की मुलं मोबाईल सोडतच नाहीत यावरती त्यांना तेवढं ताकदीचे दुसरं काही आपण देत नाही हा विचार बळावतो. जर तेवढ्याच ताकदीची दुसरी एखादी गोष्ट त्यांना मिळाली तर त्यांना मोबाईलची आठवण सुद्धा येत नाही हे प्रतिबिंबनी सिद्ध करून दाखवलं.

मुलांसाठी स्वातीताई म्हणजे दुसरी आईच. स्वातीताईचा स्वभाव इतका प्रेमळ आहे आणि तो मुलांमध्ये एकदम बहरून येतो. मुलांशी बोलत असलेल्या स्वातीताईकडे बघत बसावसं वाटतं हे मी नेहमीच अनुभवते. मुलांची ती आई असते, ताई असते, मैत्रिण असते. अशा अनेक नात्यांनी ती मुलांना वेगळ्या प्रकारचे ज्ञान आणि थोडाफार आपल्या भाषेत उपदेश देत असते पण मुलं ते सर्व अतिशय आनंदाने ऐकत असतात आणि घरी आल्यावर ते आपल्या रोजच्या जीवनात अंगीकारायचा प्रयत्न करत असतात. पाच दिवसात मुलांमध्ये होणारे बदल मी स्वत: अनुभवते आणि आश्चर्यचकित होऊन जाते.

आमच्या मळ्यातील सर्व टीम धनाजी, कमल, शोभा मावशी, अमोल आणि माझे सर्व कुटुंबीय हे सर्व माझ्या बाजूनी ठामपणे उभे असतात. या सर्वांशिवाय प्रतिबिंब पूर्ण होऊच शकत नाही आणि संदीप तर आहेच. दरवर्षी एक एक नवीन ॲडिशन करायला. मग कधी ते स्टेज असेल तर कधी एक्स्ट्राची वॉश रूम. केटरिंगचे फडके हे सुद्धा तेवढेच एकरूप झाले आहेत. इतर केटरिंगच्या कामापेक्षा हे काम त्यांना जास्त आवडतं आणि कितीही कमी आकडा असला तरीसुद्धा ते इचलकरंजी या दुसऱ्या गावातून येऊन आम्हाला खूप चांगली सर्व्हिस देतात. सगळ्यात शेवटी पण महत्त्वाचा आमचा मळा. आमच्या पूर्वजांनी तो मळा राखला आणि त्याची फळे आता आम्ही खात आहोत. सर्वच छान जुळून आले आहे.

प्रतिबिंब म्हणजे काय असं कुणी विचारलं तर मी नक्की सांगेन की तुमचे स्वत:चे प्रतिबिंब स्वच्छपणे दिसण्याची एक नामी संधी मग तुम्ही शिबिरार्थी असो नाहीतर organizer. 3 cheers for Pratibimba - Hip hip hurray!!!

**जुईली कुलकर्णी**





# प्रतिबिंब

ताई कधी वाटते फार हसावे,
कधी भरभर रडावे;
कधी छानसे फूल हातात घ्यावे,
तर कधी तेच फूल डुलताना पाहावे.

आता कळाला खरा अर्थ 'आनंदाच्या अश्रूंचा',
ते गालावरून खाली पडताना मिळणाऱ्या संतुष्टपणाचा;
वापर व्हावा तो पाचही इंद्रियांचा,
अनुभव व्हावा तो त्यांनी अनुभवलेल्या कोमलतेचा.

जाणीव आहे आता जबाबदारीची,
श्रद्धेची व वेळेची;
जाणीव झाली मला स्वत:ची;
स्वत:च्या प्रतिबिंबाची.

कसं ना ताई योगायोगाने सगळं जमून येतं!
कसं ना ताई योगायोगाने सगळं जमून येतं,
हळूच स्वत:ची ओळख करून देतं,
हळूच स्वत:ची ओळख करून देतं....

**राधा सं. कुलकर्णी**



# प्रतिबिंब एक स्वच्छंद सुसंवाद

वा! काय होता हा पाच दिवसांचा अनुभव. मी नि:शब्द आहे. खूपच समाधान वाटलं 'प्रतिबिंब'मध्ये येऊन.

**– ऋचा लिमये**

एक वेगळा अनुभव मिळतो प्रतिबिंब केल्याने. नवीन मित्र, नवीन भाऊ, आणि नवी उर्जा मिळते.

**– अभिराम नामजोशी**

माझीच मला झालेली जाणीव, Positively Accept करून, त्यावरची बदललेली मी, म्हणजे माझं प्रतिबिंब व या कार्यशाळेनी मला माझ्या स्वत:च्या 'वारी'ला जायला एक दिशा दिली, एक वाट दिली...

**राधा कुलकर्णी**

मी आधी accept केलं की हे नुसतं मजेचं शिबिर नाही. मग मी स्वातीताईवर विश्वास दाखवला. मी सगळ्यांना respect केले आणि माझ्या प्रतिबिंबावर, स्वत:वर प्रेम करायला शिकले.

**आभा काळे**

निसर्गातला आपला रोल आणि परिवारातला. मला कसं शांत रहायला पाहिजे किंवा दुसऱ्याचं बोलणं ऐकलं पाहिजे ते ही मला कळलं.
प्रतिबिंब म्हणजेच एक स्वच्छंद सुसंवाद आहे...

**सिया कुलकर्णी**

- Realization
- स्वत:शी संवाद
- स्वच्छ विचार करण्यासाठी Encouragement
- Boost for our heart.
- स्वत:चं मन ओळखण्यासाठी एक छोटीशी (गम्मतवाली) test.

**सावनी कुलकर्णी**

हा अनुभव व हे सगळे ज्ञानाचे गाठोडे मला आयुष्याच्या वाटेवरून नक्कीच उत्कृष्ट प्रकारे घेऊन जातील...

**तनुश्री बोरगावकर**

मला या शिबीराचा, कार्यशाळेचा अनुभव घेतल्यावर खूप मोकळे वाटले. मला खूप गोष्टी शिकायला मिळाल्या.

**आर्या काशीकर**

मोकळी मनं आणि पाणावलेले डोळे असा अनुभव परत परत घ्यायला येणार असल्याची हमी देतायत!

**मुक्ता लिमये**

स्वत:बद्दलचा एक दृष्टिकोन तयार झाला. रोज नवीन surprise नी रोजचा दिवस एक नवीन अनुभव होता.

**सानिका पिंगळे**



# प्रेरणा चा मागोवा

३ नोव्हेंबर २००६, काही 'प्रेरित' लोक एकत्र जमले होते आणि नाट्यक्षेत्रात, विशेषत: लहान मुलांसाठी, काहीतरी चांगले काम करण्याची चर्चा चालू होती. या चर्चेतूनच जन्माला आली 'प्रेरणा – एक कलामंच' ही संस्था.

Tagline सुद्धा अतिशय विचारपूर्वक पण अगदी सहज अशी सुचली. 'संवेदनशील मनांची', आणि मला वाटतं गेल्या बारा वर्षातल्या संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे गमक त्यातच आहे. सर्वच संस्थापक सदस्य हे 'पालक' होते. त्यामुळे आपले मूल इथे वाढणार आहे याची जाणीव, किंबहुना जबाबदारी प्रत्येकाच्याच विचारात होती.

सुरुवातीला स्पर्धांमधील सहभाग हा मुख्य कार्यक्रम असायचा. तेव्हा पासूनच नाटकांचे विषय व त्यांची मांडणी याबाबत संचालिका स्वातीताई आग्रही आहेत. तालीम सुरू होण्याच्या आधी संहितेचा विषय आणि आशय मुलांना समजावून सांगितला जातो. एकदा तो पाया पक्का झाला की मग 'संस्कारक्षम' नाटक उभं रहाणं सहजच जमून जातं. अगदी आजही ही पद्धत पाळली जाते.

पुढे जाऊन संस्थेचे स्वत:चे प्रयोग लावणे चालू झाले. वेगवेगळ्या महोत्सवातून आपली नाटके सादर केली जाऊ लागली. वसुंधरा महोत्सवासाठी दरवर्षी नवीन पर्यावरण विषयक संहिता लिहून स्वातीताई त्या बसवत असतात. त्यातूनच प्रदूषण, पाणी,



नदी संवर्धन, कचरा प्रश्न, जंगलांचे संरक्षण आदी पर्यावरणाशी संबंधित विषय अशा नाटकांमधून पोचवले जातात. सृष्टीत-गोष्टीत, 3 days 2 nights, पाचा उत्तरांची कहाणी, G1ww, कौन बनेगा कचरापती, प्रयोग क्र. १ अशा नाटकांमधून करमणूक आणि पर्यावरण विषयक प्रश्नांची जाणीव असे दोन्ही हेतू साध्य झाले.

याच बरोबरीने वेगवेगळ्या लेखकांच्या मराठी आणि अनुवादीत साहित्यावर आधारीत रंगमंचीय प्रयोग 'प्रेरणा' सादर करत असते. आत्तापर्यंत झालेल्या अशा प्रयोगांपैकी काही उल्लेखनीय म्हणजे शेकरा (रणजित देसाई), तेजस्विनी (मीच मान्या,




मीच मेरी क्यूरी – अनंत भावे), गुरूदेव (रवींद्रनाथ टागोर) आणि अतिशय लोकप्रिय झालेला कार्यक्रम 'पु. ल. आजोबा'. नव्या पिढीला अशा लेखकांची, त्यांच्या साहित्याची ओळख होण्याबरोबरच, वाचनाची आवड निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम हे कार्यक्रम करत आहेत.



याच अनुषंगाने 'प्रेरणा'च्या अजून एका विशेष उपक्रमाचा उल्लेख करणे गरजेचे आहे. वर्षभर चालणाऱ्या कार्यशाळांमध्ये महिन्यातले साधारण दोन रविवार मराठी भाषेचे वर्ग गेली जवळपास पाच वर्षे घेतले जातात. अतिशय हसत-खेळत चालणाऱ्या या वर्गांमध्ये निलीमाताई रास्ते आणि विशाखाताई वेलणकर, मुलांना शब्द आणि भाषेची गंमत खूप छान पद्धतीने रंगवून सांगतात. मुलांना भाषेची, पर्यायाने वाचनाची आणि लिहिण्याची गोडी लावण्याचे काम यामुळे घडले असे पालकांच्या प्रतिक्रियांमधून लक्षात आले.

तरूण कलाकारांचे काही वेगळे प्रयोगही याच काळात

'प्रेरणा'ने सादर केले. खेळीमेळी (शं. ना. नवरे यांचे द्विसंवाद), उडून गेलेल्या चिमण्यांना (ग्रेस यांच्या साहित्यावर आधारीत कार्यक्रम) या प्रयोगातून हे वेगळेपण प्रेक्षकांसमोर आले.

वर्षभर चालणाऱ्या कार्यशाळा म्हणजे प्रेरणाचे वैशिष्ट्य. सातत्याने मूल इथे येत राहिल्याने अपेक्षित परिवर्तन निश्चित साध्य



होते, हा 'प्रेरणा'च्या संचालिका स्वातीताई उपाध्ये यांचा विश्वास आहे. पहिल्यापासून नियमित संस्थेत येणाऱ्या मुलांमध्ये सकारात्मक बदल दिसून आले आहेत, असे पालकांकडूनच सांगण्यात येते. गेल्या बारा वर्षात 'प्रेरणा'च्या कार्यशाळा आणि त्या घेण्याची पद्धत यामध्ये सातत्याने चांगले बदल घडवत, नवीन नवीन प्रकारे 'व्यक्तिमत्त्व विकासा'ला पूरक अशा गोष्टींचा अंतर्भाव केला गेला आहे. या कार्यशाळांमधून घडलेली मुले वेगवेगळ्या क्षेत्रांमधून आत्मविश्वासाने वाटचाल करत आहेत.

गेल्या काही वर्षात 'अक्षरवाटा' हा वाचनप्रेमी लोकांसाठी कट्टा चालू करून प्रेरणाने अजून एक चांगले पाऊल टाकले आहे. सर्वांसाठी खुला असलेल्या या उपक्रमाने आता चांगलेच बाळसे धरले आहे.

'प्रतिबिंब' ही प्रेरणाची निवासी कार्यशाळा खास 'स्व-संवाद' या विषयावर निसर्गाच्या सान्निध्यात घेतली जाते. गेल्या दोन वर्षात कुमार गट, युवा गट आणि महिलांसाठी अशा निरनिराळ्या गटांसाठी ही कार्यशाळा घेतली गेली.

कलेची आस, मूल्यांचा ध्यास आणि नाविन्याची धरलेली कास ही ध्येय उराशी बाळगून कलोपासनेतून प्रेरणा देणारी, संवेदनशील मनांना समृद्ध करणारी आणि सकारात्मक दृष्टिकोन अंगी बाणवत, अनेक मूल्यांचा वेध घेत गुणवत्तापूर्ण काम करणारी 'प्रेरणा - एक कलामंच' ही संस्था एक तपाची यशस्वी वाटचाल करून पुढील प्रवासाला अधिक आत्मविश्वासाने आता निघाली आहे!

या सर्व वाटचालीत अगदी पहिल्या दिवसापासून संस्थेबरोबर असलेली माणसे अजूनही जोडलेली आहेत. नवीन आलेले मूल किंवा पालकही तितक्याच आत्मीयतेने सामावून घेतले जातात. मुलांबरोबरच पालकांनीही संस्थेच्या कामात सहभागी असावे अशी



स्वातीताईंची इच्छा असते. वेगवेगळे चांगले विचार त्यानिमित्ताने संस्थेशी जोडले जातात.

किंबहुना अशा पालकांनीच संस्थेच्या कामाचा मोठा कार्यभार वेळोवेळी सांभाळला आहे. अशी ही 'सहकारी' किंवा 'सहभागी' तत्त्वावर स्वातीताईंच्या मार्गदर्शनाखाली चालवलेली 'प्रेरणा - एक कलामंच' ही संस्था.

'प्रेरणा - एक कलामंच'च्या तपपूर्ती निमित्ताने 'प्रेरणायन' हा नाट्यमहोत्सव, ९ जून ते १५ जून २०१९ या काळात भरत नाट्य मंदिर, पुणे येथे सादर केला जात आहे. त्यानिमित्ताने संस्थेच्या वाटचालीचा हा 'मागोवा'.

**श्रीराम उपाध्ये**



*World Class product with value added Service*

अमेय

3M — Adhesives & Tapes | Abrasives | Personal Safety Products

ESAB — Welding Products

LOTUS — Converter of ▶
- Adhesive Tapes
- Automotive Fabrics
- Speciality Labels

pig New Pig — Professional facilities worldwide use PIG products to control liquids and increase productivity

## AMEYA INDUSTRIAL SUPPLIERS PVT. LTD.

## अमेय इंडस्ट्रियल सप्लायर्स प्रा. लि.

**Head Office :**
277/2, Shaniwar Peth,
Shreeram Apts., Tambe Lane,
Near Vishnukrupa Hall, Pune - 411 030.
Tel.: 020 - 2445 9303, 2445 9032
Fax : 020 - 2445 4093

**Sales Office :**
Shop No. 1, Shakuntala Apts.,
Off Telco Road, Yeshwant Nagar,
Near Magar Stadium,
Pimpri, Pune - 411 018.
**Tel.:** 09371010816

**Warehouse :**
Plot No. 1, S. No. 300/1,
Gadadavanewadi Road,
Behind Datta Temple, Tal. Mulshi,
At Post Paud, Pune - 412 108.
**Tel.** : 020 67903443

**e-mail : info@ameyagroup.co.in | visit us at : www.ameyagroup.co.in**

PHONAK
life is on

अनोखे श्रवणयंत्र तुमच्याच कानासाठी

हाताळण्यास सोपे



Phonak Audéo™ Marvel

ऐकताक्षणी प्रेमातच!

## श्रवणयंत्र नव्हे
## श्रवणमित्र

आधुनिक तंत्रज्ञानाचा आविष्कार

टीव्ही/रेडिओसाठी

- सहज नैसर्गिक आवाज
- गोंगाटात ऐकण्याचा अनुभव घ्या.
- बॅटरी बदलण्याची कटकट विसरा
- श्रवणयंत्राचे नियंत्रण आता मोबाईलने करा

आकर्षक
10%
डिस्काउंट्स

020 24476251 सदाशिव पेठ

9595609546 औंध

मार्व्हल एकदा वापरून पहा!
आपल्या कानाचे मोल आम्ही जाणतो

मांडके
हिअरिंग सर्व्हिसेस्®

मुख्य ऑफिस : समृद्धी अपार्टमेंट, ९६४, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
शाखा : मिथिला अपार्टमेंट, ८१, आनंदपार्क, बँके शेजारी, औंध, पुणे ४११००७.